# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका

अंक ९ वा (एप्रिल, मे, जून २०२५)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक ४२०२१३ |संपर्क : ९८६०५५२३२४ / ९६९९०९१२३३

Email : gharkulparivar@gmail.com l Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय ...

सप्रेम नमस्कार !!

एप्रिल मे जून 2025 चा घरकुल आनंदयात्राचा हा **नववा** अंक !

यंदाचा एप्रिल महिना कडक उन्हाचा होता. त्यामुळे आपल्य घरकुल मधील उन्हाळी कामं - नागली पापड, कुरडया, बटाटा पापड, साबुदाणा पापड बनवण्याचा धडाका होता. मुलींच्या, मावश्यांच्या हाताला आणि उत्साहाला उसंत नव्हती.

मे महिना नेहमीच्या गडबडीच्या तुलनेत थोडा शांत गेला. मुलींना उन्हाळ्याच्या पंधरा दिवस सुट्ट्या होत्या. तर जून पुन्हा गजबजला. वेगवेगळे कार्यक्रम, उपक्रम नेहमी प्रमाणे उत्साहात चालू झाले.

जूनमध्ये रोटरी क्लब ऑफ नाशिक, गोदावरी व घरकुल परिवार संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ‘गोदा स्वप्नपूर्ती कार्यशाळा’ या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रकल्पाअंतर्गत संस्थेत कापूर मशीन, धूप कांडी मशीन, फुलवाती मशीन, समई वात मशीन, धूप कप मशीन अशा पाच मशिन्स लावण्यात आल्या.

या प्रकल्पामुळे विद्यार्थिनींना नवीन कौशल्य आत्मसात करता येईल. त्यांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने हे एक मोठे पाऊल नक्कीच ठरेल.

आपल्या घरकुल मधील विद्यार्थिनींना अर्थपूर्ण मानाचे स्थान मिळवून देणे हीच आपणा सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. यात आपण सर्वजण सोबत आहात याचा खूप आनंद आणि दिलासा आहे.


### -: संपादकीय मंडळ :-

| | | |
|---|---|---|
| सौ. सुनिता आडके | नरेश महाजन | सौ. वल्लरी प्रधान |
| सौ. विद्या फडके | सौ. साधना देशमुख | डॉ. सुचिता संकपाळ |

# भेटीगाठी व कार्यक्रम

## एप्रिल 2025



घरकुलच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन डॉ.नंदू मुलमुले यांच्या हस्ते संपन्न झाले



घरकुलाचा वार्षिक स्नेह मेळावा संपन्न झाला. याप्रसंगी डॉ नंदू मुलमुले ‘चित्ती असो द्यावे समाधान’ या विषयावर संवाद साधताना

# भेटीगाठी व कार्यक्रम

## एप्रिल 2025



चित्पावन महिला मंडळ व MSEB महिला मंडळ, नाशिकरोड आयोजित चैत्रगौरीचे हळदी-कुंकू घरकुलमधील मुलींसोबत व शिक्षकांसोबत साजरे करण्यात आले



माजी उपनगराध्यक्ष स्व.रघुनाथराव जाधव यांची 100 वी जयंती जाधव कुटुंबीयांनी घरकुलमध्ये साजरी केली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## एप्रिल 2025



सन्मित्र जेष्ठ नागरिक संघ, चांदशी यांनी संस्थेला भेट दिली




एप्रिलच्या उन्हाळ्यात ऊसाच्या रसाचा आनंद घेताना घरकुलच्या मुली



बुद्ध पौर्णिमा आणि हनुमान जयंतीनिमित्त स्वातीताई पंडीत यांनी मेडिटेशनचे सेशन घेतले तसेच हनुमानाची गोष्ट सांगितली




निशिगंधा मोगल व मंगला जोशी यांनी संस्थेला भेट दिली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## मे 2025




तोलानी शिपिंग व सामाजिक बांधिलकी ग्रुप, मुंबई यांनी संस्थेला भेट दिली



श्री.मिलिंद वैद्य यांनी घरकुलला भेट दिली




तोलानी शिपिंग व सामाजिक बांधिलकी ग्रुप, मुंबई यांनी संस्थेला भेट दिली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## मे 2025




1 मे रोजी महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिन घरकुल मध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री व सौ.लाड, सॅमसोनाईटचे संचालक श्री.सुयोग जोशी आणि डॉक्टर श्री व सौ.गांगुर्डे यांची उपस्थिती लाभली



घरकुलच्या मुलींना सोमेश्वर, नवशा गणपती तसेच त्रंबकेश्वर तळेगाव येथील स्वामी समर्थ मंदिर येथे फिरण्यासाठी नेण्यात आले होते

# भेटीगाठी व कार्यक्रम

## मे 2025




जिंदाल कंपनीचे श्री.अजय विद्या भानू यांनी संस्थेला भेट दिली




घरकुलमध्ये झालेल्या पालक सभेतील एक क्षण



पीएसआय कविता पाटील यांनी आपला मुलगा अथांग याचा पहिला वाढदिवस घरकुलच्या मुलींसोबत साजरा केला

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जून 2025



ममताताई माशाळकर यांनी घरकुल स्टाफचे team building activity साठी funny games  घेतले



घरकुलमध्ये मानसशास्त्रज्ञ धनश्री केळकर यांनी घरकुलच्या स्टाफ साठी ‘मिळून साऱ्याजणी’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेतली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जून 2025




सॅमसोनाईट कंपनीचे श्री.रमेश तैनवाला यांनी घरकुलला भेट दिली



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त  Hotel Courtyard Marriot यांच्यातर्फे घरकुलमध्ये वृक्षारोपण करण्यात आले

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जून 2025



मुंबई ग्राहक पंचायतीच्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेच्या कार्याध्यक्ष श्रीमती अनुराधा देशपांडे व सर्व महिला सभासदांनी घरकुलला भेट दिली व घरकुलचे कार्य समजून घेतले



नाशिक पश्चिम मतदार संघाच्या विद्यमान आमदार सौ.सीमाताई हिरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा घरकुलमध्ये उत्साहात संपन्न झाला

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जून 2025




अमोल अविनाश गोठी यांनी त्यांच्या मुलीचा द्वितीय स्मृतिदिन घरकुलमध्ये जेवण देऊन साजरा केला.
त्यांनी 2 पल्स चेकिंग मशीन आणि  2 थर्मामीटर मुलींसाठी दिले.




स्लाईडवेल कंपनीच्या सदस्यांनी घरकुलला भेट सदिच्छा भेट दिली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जून 2025



श्री रमेश मेहेर पूज साहित्य बनवण्याच्या मशिनरीचे उद्धाटन करताना



पूजा साहित्य बनवण्याची मशिनरी - कापूर मशीन, समई वात मशीन, धूपकांडी मशीन, धूपस्टीक इत्यादी



रोटरी क्लब ऑफ नाशिक गोदावरीतर्फे घरकुलला पूजा साहित्य बनविण्याची मशिनरी देण्यात आली. त्याप्रसंगी रोटरी क्लबचे सर्व पदाधिकारी व घरकुलच्या विद्यार्थिनी

# घरकुलमधले इतर महत्त्वाचे उपक्रम

## एप्रिल 2025

श्री.संजय अहिरे यांचा पन्नासावा घरकुल मध्ये साजरा करण्यात आला

घरकुलचा स्टॉल मुंबई येथील ग्राहक पेठेमध्ये बघितल्यानंतर घरकुल परिवार कुठे असल्याची चौकशी करून सौ.रेखा लेले व त्यांची मुलगी चाफेकर संस्थेच्या भेटीसाठी आल्या. तसेच त्यांनी मुलींनी तयार केलेल्या वस्तू खरेदी करून मुलींना प्रोत्साहन दिले.

श्री.खेमराज भदाणे यांच्या मुलीचा, आदिश्रीचा, नववा वाढदिवस घरकुलमध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्यांच्यातर्फे मुलींना जेवण देण्यात आले.

भारत विकास परिषद आयोजित होमिओपॅथी कॅम्प घेण्यात आला. या कॅप मध्ये 49 मुलींचा फॉलोअपची व  2 विद्यार्थिनींची पहिल्यांदा वैद्यकीय तपासणी झाली. अशा प्रकारे या कॅम्पमध्ये 51 मुलींची तपासणी करून त्यांना औषधे देण्यात आली.

श्री.अभिषेक बिदावत यांनी अक्षय तृतीयेनिमित्त आंब्याचा रस व बटाटेवडे असे चविष्ट जेवण मुलींना दिले.

## मे 2025

22 ते 24 मे 2025 या काळात घरकुलच्या ताई सावित्रीताई व जयश्रीताई या ट्रेनिंग साठी पुणे येथील Craftition Foundation ला गेल्या होत्या. तिथे त्यांनी गृहउद्योगातील अगरबत्ती करणे, कॅन्डल तयार करणे, राखी तयार करणे, फुलांपासून होळीचे रंग तयार करणे आदी गोष्टीचे प्रशिक्षण घेतले.

बंथिया कुटुंबीय व ठक्कर कुटुंबीयांनी त्यांच्या मुलांचा वाढदिवस घरकुलमध्ये साजरा केला. तसेच मुलगा बारावी उत्तीर्ण झाल्याबद्दल घरकुलमध्ये मुलींना खाऊ वाटप करण्यात आले.

# घरकुलमधले इतर महत्त्वाचे उपक्रम

## जून 2025

श्री.संकेत बडगर यांनी त्यांचा वाढदिवस घरकुल मध्ये साजरा केला.

मानसशास्त्रज्ञ सौ. धनश्री केळकर यांनी सर्व स्टाफ साठी 'मिळून साऱ्याजणी' याविषयी एक-दिवसीय कार्यशाळा घेतली. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या खेळातून टीमवर्क किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले.

संस्थेत किंवा कुठेही काम करताना वादविवाद, गैरसमज, अबोला हे न ठेवता आपले काम कसे संस्थेला उपयोगी पडू शकते हे त्यांनी समजून दिले. प्रत्येक व्यक्ती किती महत्त्वाची आहे, ती नसताना कामावर काय परिणाम होऊ शकतो याचा विचार प्रत्येकाने करायला हवा, नवीन नवीन वस्तू तयार करताना क्रिएटिव्हिटी ॲबिलिटी प्रत्येक स्टाफमध्ये असायला हवी असा संदेश त्यांनी दिला.

मुंबई येथील श्री.हेमंत महाबळ व सौ.रेवती हेमंत महाबळ तसेच श्री.अजित महाबळ यांनी घरकुल संस्थेला भेट दिली. घरकुलचे कार्य समजून घेतले व छोटीशी देणगी देऊन घरकुलला मदत केली.

अशोक नगर येथील श्री.सुशील देसले यांनी त्यांचा वाढदिवस घरकुलच्या विद्यार्थिनी व त्यांचे कुटुंबीय आई- वडील, ताई- दाजी यांच्यासोबत साजरा केला. घरकुलतर्फे त्यांचे औक्षण करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. घरकुलचा व्हिडिओ व घरकुलची माहिती त्यांना देण्यात आली./

# आधारस्तंभ

**- श्री. अमर वैद्य व सौ. पल्लवी वैद्य**
**संस्थापक-संचालक, टेक्नोक्रॅट कंपनी**




घरकुलच्या वाटचालीत आमच्या पाठीशी अनेकांची माहिती या त्रैमासिकाच्या माध्यमातून देत आहोत.
या अंकात टेक्नोक्रॅट या सातपूर, नाशिक येथील कंपनीचे प्रमुख संचालक श्री.अमर वैद्य यांच्या कंपनीचा आणि घरकुलचा ऋणानुबंध शब्दबद्ध करताना विशेष आनंद होत आहे.
एक दशकाहून अधिक काळापासून वैद्य कुटुंबीयांचे घरकुलशी संबंध आहे. विशेषतः मुलींसाठी लागणारी वैद्यकीय मदत/ औषधे या स्वरूपात ते घरकुलची मदत करतात.
घरकुलचे एक हितचिंतक, देणगीदार, स्नेही स्लाईडवेल कंपनीचे श्री.मिलिंद जांबोटकर यांच्या फ्रेंडसर्कलच्या माध्यमातून श्री. देवेंद्र बापट, श्री. अमर वैद्य, श्री. जितेंद्र शिर्के ही सगळी मंडळी घरकुलशी जोडली गेली.

अमर वैद्य यांना घरकुलच्या कामाविषयी अत्यंत आस्था आहे. विद्याताई सांगतात, "बऱ्याचदा घरकुलच्या कामकाजाच्या संदर्भात एखाद्या तांत्रिक बाबी विषयी मार्गदर्शन व सल्ला घ्यायचा असल्यास मी अमर यांच्याशी चर्चा करते ज्यातून योग्य निर्णय घ्यायला मदत होते."

घरकुलमधील मुलींनी बनवलेल्या वस्तू घेणे, मित्र-मैत्रिणींना या वस्तू विषयी माहिती देणे अशा माध्यमातून ते घरकुलला मदत करतात.

दरवर्षी गणेशोत्सवात त्यांच्या घरी आणि कंपनीत गणेशपूजनासाठी लागणाऱ्या शाडूच्या गणेश मूर्ती ते घरकुलमधूनच घेतात. घरकुलच्या गणपतीच्या आरतीसाठी त्यांच्या कंपनीतील कर्मचारी आवर्जून येतात.

त्यांच्या कंपनीतर्फे घरकुलमध्ये राखी पौर्णिमा साजरी केली जाते. सौ. पल्लवी वैद्य या त्यांच्या कंपनीच्या माध्यमातून घरकुलशी जोडल्या गेल्या असल्या तरी आज त्या घरकुलच्या ट्रस्टी मेंबर असून आमच्या खजिनदार म्हणूनही घरकुलच्या कामकाजात, विशेषतः आर्थिक व्यवहार चोखपणे व सतर्कपणे सांभाळत आहेत.

घरकुलच्या '**Ghrakul Working Committee**' मध्येही पल्लवी यांचा मोठा सहभाग आहे.

# आधारस्तंभ - श्री जितेंद्र शिर्के व सौ भाग्यश्री शिर्के

## - श्री जितेंद्र शिर्के व सौ भाग्यश्री शिर्के
## संचालक, शिर्के इलेक्ट्रॉनिक्स



शिर्के इलेक्ट्रॉनिक्स या कंपनीचे संचालक श्री.जितेंद्र शिर्के हे देखील घरकुलचे एक खंबीर असे आधारस्तंभ आहेत. गेल्या दहा वर्षापासून घरकुलला लागणारे किराणा सामान, विशेषतः तेलाचे डबे त्यांच्यातर्फे दिले जातात.

श्री. जांबोटकर यांच्याच संकल्पनेतून या सगळ्या मित्रमंडळींनी प्रत्येकी एकेक जबाबदारी स्वीकारावी असे ठरले. दर महिन्याच्या आठ तारखेला ही ठरलेली मदत घरकुलमध्ये हजर असते. श्री अमर वैद्य आणि श्री शिर्के दोघेही दिलेला शब्द आठवणीने पाळतात ही लक्षणीय बाब आहे. घरकुल मधून कधीही त्यांना फोनवर आठवण करण्याची वेळ येत नाही.

श्री. जितेंद्र शिर्के यांचे वडीलदेखील घरकुलच्या पाठीशी होते.

श्री. जितेंद्र शिर्के यांच्या बरोबरच त्यांची पत्नी सौ. भाग्यश्री शिर्के यांना देखील घरकुलच्या कामाविषयी आपुलकी व मुलींविषयी जिव्हाळा आहे. मुलींच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी घरकुलमधून वस्तू खरेदी करतात. दिवाळीला आकाश कंदील खरेदी करतात. गणपतीच्या आरतीसाठी आठवणीने येतात. दरवर्षी घरकुलमध्ये होणाऱ्या स्नेहसंमेलनास त्या आवर्जून उपस्थित असतात.घरकुलच्या कामावर त्यांचा दृढ विश्वास आहे.

असे लोक घरकुलच्या मागे **खंबीरपणे** उभे आहेत हीच घरकुलची पुण्याई!

विद्याताई घरकुलच्या पाठीशी भक्कमपणे उभ्या राहणाऱ्या या सगळ्या व्यक्ती, संस्था, कंपन्यांबद्दल बोलताना म्हणतात,“घरकुल ला माणसांची **श्रीमंती** लाभली आहे अशी माणसं नेहमी घरकुलच्या पाठीशी असावीत अशीच प्रार्थना मी परमेश्वराला करते.”



## सौ. योगिता सूर्यवंशी, अकाउंटंट

योगिता घरकुलला जॉईन झाली तेव्हा ती बीए झालेली होती. जानेवारी 2013 मध्ये ती घरकुलच्या सेवेत रुजू झाली, त्या वेळेला अकाउंटचे काम बघणाऱ्या आधीच्या अर्चनाताई भावसार काही वैयक्तिक कारणाने काम करू शकणार नव्हत्या, त्यामुळे योगिताला घरकुलमध्ये अकाउंटंट म्हणून जबाबदारी घ्यावी लागली.

घरकुलमध्ये रुजू झाल्यानंतर तिने टॅली शिकून घेतलं. हळूहळू ती या कामात रुळली. हे काम जोखमीचे असूनही योगिताने अतिशय जबाबदारीने सांभाळले. घरकुलमध्ये आल्यानंतरच ती स्कूटर चालवायला शिकली. त्यामुळे बाहेरची कामे, यामध्ये बँकेची काम, प्रोडक्शनसाठी लागणारे सामान आणणे इत्यादी करणं तिला सोपं झालं. आता ही सगळी कामं योगिता हसतमुखाने करते.

हिशोबाचे काम, बँकेचे काम, देणग्यांच्या पावत्या, रोज येणारे ई-मेल्स, सीएसआरविषयक काम, बिलं भरणे अशी बरीच काम त्यातल्या बारकाव्यासहित ती बिनचूक करते.

योगिता घरकुल मधील अतिशय गुणी सहकारी आहे. घरकुलच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये ती सूत्रसंचालन करते. ते करताना मध्ये मध्ये कवितांच्या गाण्यांच्या ओळी वापरून ते अधिक रंजक करते. घरकुलमध्ये पाहुणे आल्यानंतर त्यांना घरकुलची माहिती सांगणे, घरकुलचे स्टॉल वेगवेगळ्या ठिकाणी असले की त्यावेळी स्टॉलला भेट देणाऱ्या लोकांना घरकुलच्या वस्तूसंबंधी माहिती सांगणे यातही तिचा पुढाकार असतो.

नवीन गोष्टी शिकण्यासाठी आमची योगिता नेहमीच तत्पर असते. मागच्याच वर्षी फोर-व्हीलर ड्रायव्हिंग पण ती शिकली. याशिवाय तिला गाण्याची आवड आहे, शिवणकामाची आवड आहे.

घरकुल मध्ये लेडीज जॅकेट पहिल्यांदा शिवले ते योगितानेच. डान्स करण्यातही तिचा पुढाकार असतो. योगितासारख्या नव्या दमाच्या सहकाऱ्यांमुळेच आमच्या घरकुलच्या सकारात्मक वातावरणात भर पडते आणि काम झटपट मार्गी लागतात.

# एकेकीची गोष्ट



## विमल गांगुर्डे

विमल ही घरकुलची अगदी सुरुवातीपासूनची एक जुनी विद्यार्थिनी. तिच्या वडिलांनी तिला घरकुल मध्ये दाखल केले. तिच्यातील अक्षमता तशी सौम्य स्वरूपाची आहे. ती अनेक कामं आवडीने करते. स्वयंपाक घरात मदत करणे, विशेषतः नागलीचे पापड बनवण्यासाठी पीठ दळून आल्यानंतर ते निगुतीने चाळणे, पापडाची खिशी घेणे या कामात ती जयश्रीताई, लताताई यांची अगदी भरवशाची मदतनीस आहे.

विमलला नृत्यातील लय, ठेका याविषयी उपजत आवड आहे. त्यामुळे समुह नृत्यातही तिचा सहभाग असतो. तिच्या रूममधील इतर मुलींचे आवरण्यास ती सुशीला मावशींना मदत करते.

अशी ही विमल घरकुल मधील एक गुणी विद्यार्थिनी आहे.



## रेणुका भिडे

रेणुका ही नाशिक मधलीच आहे आणि घरकुलची जुनी विद्यार्थिनी आहे. तिच्या कुटुंबात ती आणि तिचा भाऊ आहेत. तिला आई वडील नाहीत. रेणुका मधील दिव्यांगत्व मॉडरेट किंवा साधारण स्वरूपाचे आहे. बौद्धिक अक्षमते बरोबरच वाचा दोषसुद्धा आहे, मात्र अतिशय बोलकी आहे रेणुका. तिचा भाऊ दिवाळीला आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत तिला घरी घेऊन जातो. रेणुका स्वभावाने प्रेमळ आहे, सगळ्या मुलींशी मिळून मिसळून राहते. पेन असेंबलीचे काम मन लावून करते. ताई-मावशींचे ऐकते.

ती घरकुलमध्ये असल्यामुळे तिच्या भावाला त्याचा जॉब करता येतो. घरी तिची काळजी घेणारे दुसरे कोणीच नसल्यामुळे घरकुलमुळे खूप मोठी सोय झाल्याची त्याची भावना आहे. घरकुल अशा अनेक कुटुंबांसाठी एक दिलासा आणि आधार ठरले आहे.

# अभ्यागतांच्या लेखणीतून

घरकुल संस्थेची भेट ही मी आयुष्यातली अनमोल ठेव समजतो. इथे मुलींनी सादर केलेली कला अतिशय छान, एक नवीन आविष्कार घडवणारी होती. संस्थेची वाटचाल अशीच अनेकांचे आयुष्य समृद्ध करणारी ठरावी ही सदिच्छा व्यक्त करतो.

**- डॉ नंदू मुलमुलेडॉ नंदू मुलमुले**
**मनोविकार तज्ज्ञ, सुप्रसिद्ध लेखक आणि वक्ते**

घरकुल मध्ये आल्यापासून क्षणोक्षणी जाणवत राहिले ते इथले उबदार वातावरण,अगत्य,आपलेपणा आणि समर्पित भावना. कुठेही परकेपणा नाही, खूप दिवसाचा जणू परिचय असल्याचे जाणवत राहिले.

अतिशय उत्तम जेवण आणि तेही आयते, जेवण वाढताना ताईच्या चेहऱ्यावरचा आनंद खूप काही सांगत होता. विद्याताईंची प्रेमाची शिकवण आणि संस्कार पदोपदी जाणवत होते.

आपल्या सगळ्याच मुली त्यांचे निरागसपण इथे जपलं गेलंय याचा प्रत्यय पदोपदी येत होता. दैवानी काही गुण नाकारलेल्या ह्या मुलीना आपण त्यांच्यातील नेमकेपणा हेरून त्यांना सांभाळताय, त्यांच्यावर अपार मेहनत घेऊन त्यांच्यात सक्षमता निर्माण करताय याचे शब्दात वर्णन करता येणे शक्य नाही. आपल्या सगळ्याच मावश्या ताई अत्यंत आदरपूर्वक संस्थेची माहिती देत होत्या.

आपली सर्व वर्कशॉप बघितली. मुलीनी सादर केलेले कार्यक्रम बघताना त्यांना दिव्यांग का म्हणावे?

आपले विश्वस्त श्री. राठी सर, एवढ्या मोठ्या पदावरील आणि मोठे उद्योजक, आमच्यासाठी त्यांच्या अतिव्यग्र दिनचर्येतून वेळ काढून आले आणि पूर्ण वेळ बरोबर राहिले.

सह्याद्री फार्म्सच्या विलास शिंदे सरांनी त्यांच्या व्यग्र दिनचर्येतून वेळ काढून आम्हांला जवळजवळ दीड तास दिला. अशी व्यक्तिमत्त्व मोठी का आणि कशी होतात हे त्या दोघांकडून बघून शिकावे असे अल्पावधीत जाणवले.

या भेटीतली सर्वच ठिकाणे आमच्या सारख्यांना दुर्मिळ योगाची होती आपल्यामुळे हा योग जुळून आला. याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. आपले सूर कुठेतरी जुळावे लागतात. मला वाटते माझे सूर तुमच्या बरोबर जुळले आहेत.

या भेटीतली सर्वच ठिकाणे आमच्या सारख्यांना दुर्मिळ योगाची होती आपल्यामुळे हा योग जुळून आला. याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. आपले सूर कुठेतरी जुळावे लागतात. मला वाटते माझे सूर तुमच्या बरोबर जुळले आहेत.

**अनुराधा देशपांडे,**
**कार्याध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत**

# कृतज्ञतेचा नमस्कार

'एखादे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण मनापासून ध्यास घेतो, तेव्हा ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी संपूर्ण विश्व तुम्हाला साहाय्यभूत होते,' असे म्हणतात ते खोटे नाही.
घरकुल सुरू झाल्यापासून आतापर्यंत अनेक व्यक्ति, संस्था, कंपन्या यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरूपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे आमचा 17-18 वर्षांचा हा प्रवास सोपा झाला.
समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आम्हाला आमच्या मुलींना एक आनंददायी आणि दर्जेदार वातावरण देता आले.
यामुळेच घरकुल एक संस्था न रहाता एक संयुक्त कुटुंब बनले आणि आश्वासक वाटचाल करत आहे.
त्यासाठी भविष्यातही आपल्या सर्वांची साथ, सहकार्य आणि जिव्हाळा हवाय.
आपल्या प्रत्येकाविषयी आमच्या मनात असलेल्या भावना शब्दांत मांडणे कठीण आहे मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू,
सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद आणि कृतज्ञतेचा नमस्कार!
घरकुल आपले ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे, हितचिंतकांचे घरकुलात कायम स्वागत आहे.

## * आवाहन *

## -: ऑनलाईन देणगीसाठी :-

देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट

A/C Name : Gharkul Parivar Sanstha
Bank Name : Bank of India
Branch : Shivaji Udyan, Nashik
A/C No. : 080610110000256
IFSC : BKID0000806